Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

। मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६ । वर्ष १ ।अंक १३७ ।पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

**पारोळ्यात महाराणा प्रतापसिंहजींच्या पुतळ्यासाठी निधी मंजूर**
(पान २ वर)



## शासकीय कंत्राटदार घेणार राज ठाकरेंची भेट, आंदोलन तीव्र करणार

# सरकारकडं तब्बल 86 हजार कोटी अडकले

### कंत्राटदार टप्प्याटप्प्याने आपला आंदोलन तीव्र करणार

**जन सम्राट टाईम्स**

**नवी दिल्ली । शासकीय कंत्राटदार उद्या मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची सकाळी 11 वाजता शिवतीर्थ या निवासस्थानी भेट घेणार आहेत. कंत्राटदारांचे 86 हजार कोटी अजूनही सरकारकडून मिळालेले नाहीत.**

त्यामुळं ही थकबाकी मिळावी यासाठी कंत्राटदार मागील अनेक दिवसांपासून ठीक ठिकाणी आंदोलन करत आहेत. कंत्राटदारांच्या आंदोलनाची कुठलीही दखल सरकारकडून घेतली जात नसल्याने उद्या मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट कंत्राटदार संघटनेचे पदाधिकारी घेणार आहेत. राज ठाकरे यांनी कंत्राटदारांच्या प्रश्नसंदर्भात याआधी सुद्धा प्राथमिक चर्चा केल्याची माहिती मिळाली आहे. राज ठाकरे कंत्राटदारांच्या मागण्यासंदर्भात सरकारची चर्चा करून मध्यस्थी करतील आणि कंत्राटदारांचा प्रश्न सोडवतील अशी आशा कंत्राटदार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना आहे. हे सर्व कंत्राटदार टप्प्याटप्प्याने आपला आंदोलन तीव्र करणार आहेत. त्यामुळे मनसेचा सुद्धा या कंत्राटदारांच्या आंदोलनाला पाठिंबा मिळावा या दृष्टीने सुद्धा राज ठाकरेंची वेळ कंत्राटदार संघटनांनी भेटीसाठी मागितली आहे.दरम्यान, गेल्या अनेक दिवसांपासून शासकीय कंत्राटदाराचे मोठ्या प्रमाणात पैसे सरकारकडे अडकले आहेत. वारंवार याबाबत मागणी केली जात आहे. अनेक ठिकाणी शासकीय कंत्राटदारांनी आंदोलने देखील केली आहे. सरकारने 15 ऑगस्ट 2026 पर्यंत प्रलंबित असलेली सर्व पात्र बिले तातडीने अदा करावीत, अशी प्रमुख मागणी कंत्राटदारांची आहे. सरकारने प्रत्येक विभागाचा प्रलंबित बिलांचा विभागनिहाय



आढावा घ्यावा. त्यानंतर निश्चित कालमर्यादेत बील अदा करण्याविषयी वेळापत्रक जाहीर करावेत. रखडलेल्या बिलांसाठी आवश्यक निधीची तातडीने तरतूद करावीत. त्याचबरोबर मुख्यमंत्री, वित्त मंत्री, संबंधित सर्व विभागांचे मंत्री आणि वरिष्ठ अधिकारी यांच्यासोबत महाराष्ट्र राज्य शासकीय कंत्राटदार फेडरेशनच्या प्रतिनिधी मंडळाची संयुक्त बैठक तातडीने आयोजित करण्यात यावी, अशा कंत्राटदारांच्या मागण्या आहेत. दरम्यान, सरकारनं प्रत्येक विभागाच्या प्रलंबित बिलांबाबत चर्चा करावी अशी मागणी देखील शासकीय कंत्राटदारांनी केली आहे. त्यानंतर यातील प्रत्यक्ष अडचणी दूर कराव्यात. भविष्यात शासकीय कंत्राटदारांची बिले दीर्घकाळ प्रलंबित राहणार नाही, यासाठी कायमस्वरुपी आर्थिक व्यवस्था निर्माण करावी, अशीही त्यांची मागणी आहे. आता शासकीय कंत्राटदारांच्या मागण्याकडे सरकार कसे पाहते हे बघणं देखील महत्वाचं असणार आहे. मात्र, त्यापूर्वी उद्या राज ठाकरे यांच्यासोबत होण्या बैठकीत नेमकी काय चर्चा होणार याकडं देखील सर्वाचं लक्ष लागलं आहे. राज ठाकरे नेमकी काय भूमिका घेणार हे पाहणं देखील महत्वाटं ठरणार आहे. त्यामुळं ही थकबाकी मिळावी यासाठी कंत्राटदार मागील अनेक दिवसांपासून ठीक ठिकाणी आंदोलन करत आहेत. कंत्राटदारांच्या आंदोलनाची कुठलीही दखल सरकारकडून घेतली जात नसल्याने उद्या मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट कंत्राटदार संघटनेचे पदाधिकारी घेणार आहेत. राज ठाकरे यांनी कंत्राटदारांच्या प्रश्नसंदर्भात याआधी सुद्धा प्राथमिक चर्चा केल्याची माहिती मिळाली आहे.

**आंदोलन तीव्र करणार**

राज ठाकरे कंत्राटदारांच्या प्रश्नांसंदर्भात त्यांच्या मागण्यासंदर्भात सरकारची चर्चा करून मध्यस्थी करतील आणि कंत्राटदारांचा प्रश्न सोडवतील अशी आशा कंत्राटदार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना आहे. हे सर्व कंत्राटदार टप्प्याटप्प्याने आपला आंदोलन तीव्र करणार आहेत. त्यामुळे मनसेचा सुद्धा या कंत्राटदारांच्या आंदोलनाला पाठिंबा मिळावा या दृष्टीने सुद्धा राज ठाकरेंची वेळ कंत्राटदार संघटनांनी भेटीसाठी मागितली आहे.दरम्यान, गेल्या अनेक दिवसांपासून शासकीय कंत्राटदाराचे मोठ्या प्रमाणात पैसे सरकारकडे अडकले आहेत. वारंवार याबाबत मागणी केली जात आहे.

**Selected**

### हुल्लडबाजीत भाविकाचा मृत्यू

हिंगोली - भक्तीच्या नावाखाली सुरू असलेल्या डीजेच्या जीवघेण्या स्पर्धेला आता निष्पाप भाविकांच्या जीवाची किंमत मोजावी लागली. औंढा नागनाथ येथे दर्शनासाठी गेलेल्या कावड यात्रेतील दोन ध्वनीक्षेपक चालकांमध्ये वाहन मागेपुढे घेण्यावरून सुरू झालेली चढाओढ एका १९ वर्षीय भाविकाच्या मृत्यूला कारणीभूत ठरली. डिग्रस कऱ्हाळे शिवारात घडलेल्या या घटनेत सोमनाथ रोहिदास भानावत यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. श्रावण महिन्यानिमित्त वाशिम जिल्ह्यातून भाविक कावड यात्रेद्वारे औंढा नागनाथ येथे दर्शनासाठी आले होते. दर्शन आटोपून परतताना डिग्रस कऱ्हाळे परिसरात सायंकाळी सहाच्या सुमारास भाविक चहा-पाण्यासाठी थांबले होते. यावेळी डीजेच्या तालावर भाविक नाचत असतानाच दोन डीजे चालकांमध्ये वाहन पुढे-मागे घेण्यावरून स्पर्धा सुरू झाली.

## पोलिसांनी इलेक्ट्रिक शॉक उपकरणे, पेलेट गनचा अतिवापर केला!

### आंदोलन हिंसक झाल्यानंतरच बळाचा वापर केल्याचा पोलिसांचा दावा

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | (प्रतिनिधी):** दिल्लीतील जंतर-मंतर येथे झालेल्या आंदोलनामध्ये पोलिसांनी इलेक्ट्रिक शॉक देणारी उपकरणे आणि पेलेट गन्ससह बळाचा अतिवापर केला, असे 'अ‍ॅम्नेस्टी इंटरनॅशनल'ने अहवालात म्हटले. हा अहवाल पोलिसांच्या दाव्याशी विसंगत आहे. आंदोलक हिंसक झाल्यानंतरच बळाचा वापर केला गेला, असे पोलिसांनी म्हटले होते. सर्वोच्च न्यायालयाने पोलीस आणि आंदोलक या दोघांकडून झालेल्या हिंसाचाराची चौकशी करण्यासाठी गुरुवारी एका समितीची स्थापना केल्यानंतर हा अहवाल आला आहे. अ‍ॅम्नेस्टीने अहवालात म्हटले आहे की, त्यांनी पडताळलेल्या प्रत्यक्षदर्शींच्या साक्षी आणि दृश्य पुराव्यांवरून दिल्ली आणि बिहारमध्ये आंदोलकांविरोधात "पेलेट-फायरिंग शॉटगन्स, अश्रूधुराची नळकांडी, लाठ्या आणि इलेक्ट्रिक शॉक देणारी उपकरणे" वापरल्याची पुष्टी झाली आहे. बिहारच्या सिवान जिल्ह्यात एका पोलीस अधिकाऱ्याने "गर्दीवर बेकायदेशीरपणे जीवघेण्या बळाचा वापर" केल्याच्या दोन घटनांचीही पडताळणी केल्याचे अ‍ॅम्नेस्टीने सांगितले.आंदोलनामध्ये यात कोणाचाही मृत्यू झाला नाही, असे अहवालात म्हटले आहे. "पोलिसांनी शस्त्रे अशा प्रकारे वापरली गेली ज्यामुळे आंतरराष्ट्रीय कायदा व मानके तसेच देशांतर्गत पोलीसिंग मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन झाले," असेही त्यात नमूद केले आहे. अ‍ॅम्नेस्टीने म्हटले



की, "निदर्शकांकडून दगडफेक झाल्याच्या काही तुरळक घटना" घडल्या होत्या, परंतु "पोलिसांची कठोर कारवाई ही गर्दीवर नियंत्रण मिळवण्याच्या नावाखाली केलेली सरकारी-मान्यताप्राप्त हिंसा होती." अहवालात म्हटले आहे की, नाव न सांगण्याच्या अटीवर अ‍ॅम्नेस्टी इंटरनॅशनलशी बोलताना, छऱ्यांमुळे जखमी झालेल्या एका आंदोलकाने सांगितले: “मी कनॉट प्लेसजवळ होतो आणि आंदोलक व पोलिसांमध्ये बाचाबाची झाली. तरीही, बहुतेक आंदोलन शांततापूर्ण राहिले. आरएएफचे अधिकारी अश्रुधूर वापरत होते, पण नंतर, कोणतीही पूर्वसूचना न देता, त्यांनी पेलेट झाडणाऱ्या शॉटगनचा वापर सुरू केला.माझ्यापासून ३००-४०० मीटर अंतरावर उभ्या असलेल्या एका अधिकाऱ्याला, मी जिथे उभा होतो त्या दिशेने शॉटगन रोखताना पाहिले. मी विरुद्ध दिशेने पळू लागलो आणि त्याच वेळी माझ्या पाठीवर पेलेट लागला. मला अंदाजे २५-३० जखमा झाल्या होत्या आणि मी तात्काळ रुग्णालयात गेलो. डॉक्टरांनी त्या पेलेटमुळे झालेल्या जखमा असल्याचे सांगितले. सुदैवाने, माझी हाडे वाचली आहेत, पण माझ्या शरीरावर गंभीर व्रण उमटले आहेत.”

## महायुतीत स्थानिक पातळीवर धुसफूस

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी:** महायुतीतील अंतर्गत वाद आणि मतभेद मिटवण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या समन्वय समितीच्या बैठकीत विविध महत्त्वाच्या मुद्द्यांवर सखोल चर्चा झाली. राज्यातील रखडलेली महामंडळे आणि जिल्हा नियोजन समितीच्या निधी वाटपाचा आढावा या बैठकीत घेण्यात आला. वारंवार सूचना देऊनही महायुतीमधील पक्षांमध्ये स्थानिक स्तरावर सातत्याने धुसफूस सुरु असल्याने स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व प्रमुख नेत्यांना सक्त ताकीद दिली आहे

पहिल्यांदाच मुख्यमंत्री फडणवीसांनी महायुतीच्या समन्वय समितीची बैठक घेतली. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत महायुती समन्वय समितीची बैठक पार पडली. गेल्या काही दिवसांत अशा काही घडामोडी घडल्या. ज्यावरून महायुतीत समन्वय आहे का, असा सवाल उपस्थित झाला होता. त्यामुळे समन्वय समितीच्या बैठकीत मुख्यमंत्र्यांनी मार्गदर्शन केलं. या बैठकीत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, हसन मुश्रीफ, गिरीश महाजन, संजय खोडके, चंद्रशेखर बावनकुळे शंभुराज देसाई, छगन भुजबळ बैठकीला उपस्थित होते.



महायुतीत समन्वय राखण्याबाबत बैठकीत चर्चा झाल्याची माहिती मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. तसेच स्थानिक स्तरावर महायुतीमध्ये पूर्ण समन्वय राखण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. महायुतीतील कोणत्याही आमदार किंवा खासदाराने एकमेकांच्या नेत्यांवर अथवा पक्षांवर सार्वजनिक टीका करू नये, अशा कडक सूचना सर्वांना देण्यात आल्या आहेत अशी माहिती चंद्रशेखर बावनकुळे यांनी बैठकीनंतर दिली.ज्या जिल्ह्यांमध्ये निधी वाटपावरून महायुतीतील घटक पक्षांमध्ये मतभेद उद्भवतील, तिथे सर्वप्रथम विभागीय आयुक्तांमार्फत तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाईल. तिथेही तोडगा न निघाल्यास समन्वय समितीच्या पातळीवर निर्णय घेतला जाईल. तरीही वाद न मिटल्यास अंतिम निर्णय मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत घेतला जाईल. महामंडळांच्या अंतिम फेरबदलासाठी आणि वाटपासाठी अजून 1 ते 2 बैठका होण्याची शक्यता आहे. पुढील 15 दिवसांत महामंडळ वाटपावर अंतिम शिक्कामोर्तब केले जाईल अशी माहिती मिळत आहे.

### काम करू शकत नाही : गडकरी

नवी दिल्ली : केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी हे त्यांच्या रोखठोक विधानांमुळे, उत्कृष्ट कामांमुळे आणि राजकीय भूमिकेमुळे नेहमीच चर्चेत असतात. त्यांच्या वक्तव्यांमुळे आणि कामाच्या शैलीमुळे ते अनेकदा माध्यमांमध्ये केंद्रस्थानी असतात.
अशातच नितीन गडकरी यांनी केलेल्या एका वक्तव्यामुळे त्यांच्या राजकीय निवृत्तीची चर्चा सुरू झाली आहे.
जुन्या पिढीतील लोकांनी हळूहळू बाजूला होऊन नव्या पिढीला संधी दिली पाहिजे आणि स्वतः मार्गदर्शकाची भूमिका स्वीकारली पाहिजे, असे गडकरी यांनी म्हटले.

## निशा साबळेनं राहुल गांधींसमोर आदिवासी विद्यार्थ्यांचे प्रश्न मांडले

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली |प्रतिनिधी:** लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहिलं आहे. या पत्रात महाराष्ट्रातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या समस्यांचा उल्लेख आहे. राहुल गांधी यांनी पुण्यात 22 ऑगस्टला छात्रों की गुंज हा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात राहुल गांधी यांना पुण्यातील मांजरी येथे सुरु असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनातील आंदोलक विद्यार्थिनी निशा साबळे हिने एक निवेदन दिलं होतं. ते निवेदन देखील लोकसभेच्या विरोधी पक्षनेत्यांकडून मुख्यमंत्र्यांना पाठवण्यात आलं आहे. राहुल गांधी



यांच्या पुण्यातील छात्रों की गुंज या कार्यक्रमात आदिवासी विद्यार्थिनी निशा साबळे सहभागी झाली होती. तिनं आदिवासी विद्यार्थी आणि विद्यार्थिनींचे प्रश्न पोटतिडकीनं मांडले होते. निशा साबळेनं मांडलेल्या समस्यांसह राज्यात सुरु असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची राज्य सरकारनं दखल घ्यावी असं राहुल गांधी म्हणाले आहेतआदिवासी विद्यार्थी 10 दिवसांहून अधिक काळापासून उपोषण करत आहेत. पुण्यातील 'छात्रों गी गुंज' कार्यक्रमात विद्यार्थिनीनं सांगितलं की वसतीगृहात वास्तव्यासाठी 30 वर्षांची वयोमर्दाया घालण्यात आलेली आहे, अपमानास्पद नियम लागू आहेत. मुलींसाठी प्रेग्नन्सी टेस्ट सारख्या अमानवी गोष्टी लागू आहेत. दुर्गम भागातील गाव खेड्यातून आलेले विद्यार्थी दान मागत नाहीयेत, ते त्यांचा अधिकार मागत आहेत. तुम्ही त्यांना व्यक्तिगतरित्या भेटून त्यांच्या समस्या तात्काळ सोडवाल, अशी अपेक्षा असल्याचं राहुल गांधी यांनी म्हटलंय. आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतीगृहात अन्न, स्वच्छता आणि वैद्यकीय सेवांचा तुटवडा आहे. सर्पदशांमुळं मुलांचा मृत्यू होतोय.सुविधांची स्थिती खराब आहे, अशा समस्या राहुल गांधी यांनी मांडल्या आहेत. विद्यार्थिनींच्या फिटनेस टेस्टच्या नावाखाली घेतल्या जाणाऱ्या प्रेग्नन्सी टेस्टची माहिती मिळताच धक्का बसला, असं राहुल गांधी म्हणाले.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

## देशात खरंच साखरेचा तुटवडा आहे का?

### सरकारनं 10 लाख टन साखर आयातीचा निर्णय का घेतला? ISMA नं दिली महत्वाची माहिती

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी:** सणासुदीच्या काळात साखरेनं ग्राहकांना मोठा झटका दिला आहे. साखरेच्या दरात (SUGAR PRIC) मोठी वाढ झाली आहे. गेल्या एका महिन्यात किरकोळ आणि घाऊक बाजारात साखरेच्या किंमती 24 टक्क्यांची वाढ झाली आहे. साखरेच दर 60 ते 70 रुपये प्रति किलोवर पोहोचले आहेत. दरम्यान, देशात खरच साखरेचा तुटवडा आहे का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. याबाबत इंडियन शुगर मिल्स असोसिएशन अर्थात ISMA चे अध्यक्ष नीरज शिरगावकर यांनी महत्वाची माहिती दिली आहे. सणासुदीच्या काळातच साखरेच्या वाढत्या



किमतींमुळे सर्वसामान्यांची चिंता वाढली आहे. किमती नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकारने 20 ऑगस्ट रोजी 10 लाख टन कच्च्या साखरेच्या शुल्कमुक्त आयातीला मंजुरी दिली. मात्र, इंडियन शुगर मिल्स असोसिएशनने (ISMA) देशात साखरेची कोणतीही कमतरता नसल्याचे स्पष्टपणे म्हटले आहे. ISMA चे अध्यक्ष नीरज शिरगावकर यांच्या म्हणण्यानुसार, 1 ऑगस्टपर्यंत देशाकडे साडेतीन महिन्यांचा साठा उपलब्ध होता. त्यांच्या मते, या महिन्यात घाबरण्याची गरज नाही. शुल्कमुक्त आयातीला परवानगी देण्याचा सरकारचा निर्णय हा कोणतीही कमतरता दूर करण्यासाठी नसून, एक खबरदारीचा उपाय आहे. यामुळे पुरवठा सुधारेल. या निर्णयामुळे अंदाजित अंतिम साठा 25 ते 29 टक्क्यांनी वाढेल. बाजारातील सट्टेबाजीचा धोका टाळण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. अलीकडील भाववाढ ही प्रामुख्याने सट्टेबाजांनी केलेल्या साठेबाजीमुळे झाली आहे. शिवाय, खराब हवामानाचा उत्पादनावर किंचित परिणाम झाला आहे. नॅशनल फेडरेशन ऑफ कोऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीजचे (NFCSF) अध्यक्ष प्रकाश नाईकनवरे यांनी देशांतर्गत पुरवठा पूर्णपणे पुरेसा असल्याचे आश्वासन दिले आहे. 2025-26 हंगामासाठी साखर उत्पादन 27.9 दशलक्ष टन होण्याचा अंदाज आहे. 1 ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या 2026-27 हंगामासाठी सुरुवातीचा साठा 3.5 दशलक्ष टन असण्याची अपेक्षा आहे. भारतात दरमहा अंदाजे 2.2 दशलक्ष टन साखरेचा वापर होत असल्याने, नोव्हेंबरपर्यंत 1.5 ते 2 दशलक्ष टन साखर शिल्लक राहील. तोपर्यंत, नवीन गाळप प्रक्रियेतून ताजा पुरवठा देखील बाजारात येईल.दरम्यान, साखरेच्या आयातीबाबत नाईकनवरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, साखरेचे काही साठे १५ ऑक्टोबरपूर्वी भारतीय बंदरांवर येऊ शकतात. सध्या, ब्राझील हा एकमेव आयातीचा पर्याय आहे, कारण थायलंड स्वतः साखरेच्या तुटवड्याचा सामना करत आहे. ब्राझीलमधून भारतीय बंदरांपर्यंत माल पोहोचायला साधारणपणे 40 ते 45 दिवस लागतात. बंदरांपासून कारखान्यांपर्यंत माल पोहोचायला अतिरिक्त वेळ लागतो. हे डीजीएफटीची (DGFT) मंजुरी आणि पतपत्रांच्या (लेटर्स ऑफ क्रेडिट) वितरणासह विविध टप्प्यांवर अवलंबून असते.



# अकलूदच्या तापी नदीकाठच्या घरावर छापा!

## चार महिलांची सुटका बनावट ग्राहक पाठवून कारवाई

जन सम्राट टाईम्स

**याव ल| प्रतिनिधी:** यावल तालुक्यातील अकलूद गावाच्या शिवारात तापी नदीकाठी असलेल्या दुमजली घरात कथितरीत्या सुरू असलेल्या कुंटणखान्यावर फैजपूर पोलिसांनी गुरुवारी, दि. २० ऑगस्ट रोजी रात्री सुमारे ८ वाजता छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत वेश्याव्यवसायासाठी आणलेल्या चार महिलांची पोलिसांनी सुटका केली असून, सदर व्यवसाय चालविणाऱ्या संशयित महिलेविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अकलूद येथील मनीषा प्रकाश झोपे (वय ४५) ही महिला संबंधित ठिकाणी वेश्याव्यवसाय चालवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलिसांनी नियोजनबद्ध पद्धतीने कारवाई केली. प्रथम बनावट ग्राहक संबंधित ठिकाणी पाठवून माहितीची खात्री करण्यात आली. त्यानंतर पोलीस पथकाने दुमजली घरावर छापा टाकला. छाप्यादरम्यान घरामध्ये वेश्याव्यवसायासाठी स्वतंत्र खोल्यांची व्यवस्था करण्यात आल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. या ठिकाणी वेश्याव्यवसायासाठी आणलेल्या चार महिलांची पोलिसांनी सुटका केली.

त्यापैकी तीन महिला मूळच्या पश्चिम बंगालमधील असून सध्या भुसावळ येथे वास्तव्यास असल्याची माहिती समोर आली आहे. तर अन्य एक महिला भुसावळ येथीलच असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी कुंटणखाना चालविल्याच्या आरोपावरून मनीषा झोपे हिच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात



आली असून, फैजपूर पोलिसांकडून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली फैजपूर उपविभागीय पोलीस कार्यालय, यावल पोलीस ठाणे, फैजपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप रमेश पाटील, निंभोरा पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदार यांच्या संयुक्त पथकाने केली. यावल तालुक्यातील अकलूद गावाच्या शिवारात तापी नदीकाठी असलेल्या दुमजली घरात कथितरीत्या सुरू असलेल्या कुंटणखान्यावर फैजपूर पोलिसांनी गुरुवारी, दि. २० ऑगस्ट रोजी रात्री सुमारे ८ वाजता छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत वेश्याव्यवसायासाठी आणलेल्या चार महिलांची पोलिसांनी सुटका केली असून, सदर व्यवसाय चालविणाऱ्या संशयित महिलेविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अकलूद येथील मनीषा प्रकाश झोपे (वय ४५) ही महिला संबंधित ठिकाणी वेश्याव्यवसाय चालवत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलिसांनी नियोजनबद्ध पद्धतीने कारवाई केली. प्रथम बनावट ग्राहक संबंधित ठिकाणी पाठवून माहितीची खात्री करण्यात आली. त्यानंतर पोलीस पथकाने दुमजली घरावर छापा टाकला. छाप्यादरम्यान घरामध्ये वेश्याव्यवसायासाठी स्वतंत्र खोल्यांची व्यवस्था करण्यात आल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले.कुंटणखाना चालविल्याच्या आरोपावरून मनीषा झोपे हिच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात आली असून, फैजपूर पोलिसांकडून प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली फैजपूर उपविभागीय पोलीस कार्यालय, यावल पोलीस ठाणे, फैजपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप रमेश पाटील, निंभोरा पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदार यांच्या संयुक्त पथकाने केली.

# हातगाव ग्रामसभेचा दारूबंदीचा एल्गार!

जन सम्राट टाईम्स

**बोधेगाव | प्रतिनिधी :** शेवगाव तालुक्यातील हातगाव येथे स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित ग्रामसभेत अवैध दारूविक्रीविरोधात ग्रामस्थांनी एकजुटीने आवाज उठविला. गावातील विविध भागांसह शेवगाव-कांबी व पैठण-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात सुरू असलेली अवैध देशी दारूविक्री तात्काळ बंद करण्यात यावी, असा ठराव ग्रामसभेत एकमताने मंजूर करण्यात आला. गेल्या काही महिन्यांपासून गावात उघडपणे अवैध दारूविक्री सुरू असल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण असल्याचे ग्रामस्थांनी ग्रामसभेत सांगितले. विशेषतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरातील परिस्थितीमुळे विद्यार्थी, महिला, रुग्ण तसेच सर्वसामान्य नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार करण्यात आली. शाळा आणि प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात दारूविक्रीमुळे चिंता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाच्या जवळच रामेश्वरदास विद्यालय तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र असल्याने या परिसरात होणाऱ्या अवैध दारूविक्रीमुळे विद्यार्थ्यांसह रुग्ण आणि आरोग्य कर्मचाऱ्यांवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असल्याची चिंता ग्रामस्थांनी व्यक्त केली. शैक्षणिक व आरोग्य संस्थांच्या परिसरात अवैध दारूविक्रीला आळा घालण्यासाठी प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. ग्रामसभेचेकामकाजवेगळ्यापद्धतीने स्वातंत्र्यदिनानिमित्त आयोजित या ग्रामसभेच्या अध्यक्षस्थानी प्रशासक अरुण मातंग होते. ग्रामसेवक संघटनेने ग्रामसभेतील सचिवपदाच्या कामावर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतल्याच्या पार्श्वभूमीवर ग्रामविकास अधिकारी संजय दारूणकर यांनी तटस्थ राहण्याचा निर्णय घेतला.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# ग्रामपंचायतींच्या कारभारात पारदर्शकतेसाठी 'टीम समर्पण फाउंडेशन'चे निवेदन!

## GPS व बायोमेट्रिक हजेरीची सक्तीची मागणी




जन सम्राट टाईम्स

**सोयगाव | प्रतिनिधी :** ग्रामपंचायतींच्या कारभारात पारदर्शकता आणण्यासह ग्रामसेवक व संबंधित अधिकारी गावात वेळेवर उपस्थित राहावेत, यासाठी शासनाच्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी *"टीम समर्पण फाउंडेशन"*च्या वतीने करण्यात आली. याबाबत सोमवारी, २४ ऑगस्ट २०२६ रोजी सोयगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यमुलवाड यांना निवेदन देण्यात आले. गावाच्या विकासासाठी प्रशासनाची कार्यक्षमता, वेळेवर उपस्थिती आणि पारदर्शक कारभार अत्यंत महत्त्वाचा आहे. ग्रामविकास विभागाने ग्रामसेवक व संबंधित अधिकाऱ्यांच्या उपस्थितीवर देखरेख ठेवण्यासाठी GPS व बायोमेट्रिक हजेरी प्रणाली लागू करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, सोयगाव तालुक्यात या निर्देशांची प्रत्यक्षात कितपत अंमलबजावणी होत आहे, असा सवाल फाउंडेशनच्या वतीने उपस्थित करण्यात आला. बायोमेट्रिक हजेरीबाबत प्रशासनाने खुलासा करावा सोयगाव तालुक्यात नेटवर्क कनेक्टिव्हिटी उपलब्ध असताना ग्रामसेवक व अधिकाऱ्यांसाठी बायोमेट्रिक हजेरी प्रणाली लागू करण्यात कोणती प्रशासकीय अथवा तांत्रिक अडचण आहे, याचा प्रशासनाने स्पष्ट खुलासा करावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. ग्रामपंचायतीतील कर्मचारी व अधिकारी कार्यालयीन वेळेत नियमितपणे उपस्थित राहिल्यास नागरिकांना शासकीय योजनांची माहिती, विविध दाखले, विकासकामांशी संबंधित माहिती तसेच अन्य प्रशासकीय सेवा वेळेत मिळण्यास मदत होईल. त्यामुळे GPS व बायोमेट्रिक हजेरी प्रणाली तातडीने आणि सक्तीने लागू करावी, अशी आग्रही मागणी 'टीम समर्पण फाउंडेशन'ने केली. पारदर्शक कारभारासाठी लढा सुरूच ठेवणार ग्रामस्थांच्या हक्कांचे संरक्षण, प्रशासनातील पारदर्शकता आणि गावांच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या शासकीय निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. नागरिकांना प्रशासनाकडून वेळेत आणि योग्य सेवा मिळाव्यात, यासाठी 'टीम समर्पण फाउंडेशन'चा पाठपुरावा सुरूच राहणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# अल्पावधीतच मिळवला महाराष्ट्राचा नावलौकिक

## एम. प्रकाश इंडस्ट्रीज'च्या शाखेने पूर्ण केले यशस्वी पहिले वर्ष!

जन सम्राट टाईम्स

**कर्जत । प्रतिनिधी:** अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात अल्पावधीतच ग्राहकांच्या विश्वासावर आपला ठसा उमटविणाऱ्या *"एम. प्रकाश ऑइल इंडस्ट्रीज"*च्या कर्जत शाखेने यशस्वीपणे पहिले वर्ष पूर्ण केले आहे. शाखेचा प्रथम वर्धापन दिन मंगळवार, २५ ऑगस्ट रोजी उत्साहात साजरा होत आहे. दर्जेदार उत्पादने, गुणवत्तेची सातत्यपूर्ण हमी आणि ग्राहकांना दिली जाणारी तत्पर सेवा यामुळे 'एम. प्रकाश ऑइल इंडस्ट्रीज'ने अल्पावधीतच ग्राहकांच्या पसंतीस उतरून आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. कर्जत शाखेच्या माध्यमातून व्यवसायाचा विस्तार करताना ग्राहकांचा विश्वास संपादन करण्यात संस्थेला यश आले आहे. ग्राहकांचा विश्वास हीच संस्थेच्या यशाची खरी ताकद प्रथम वर्धापन दिनानिमित्त संस्थेचे चेअरमन महादेव सुरवसे, कंपनीचे सीईओ प्रा. राम काळे आणि व्हाइस चेअरमन मच्छिंद्र गव्हाणे यांनी सर्व ग्राहक, हितचिंतक आणि वितरकांचे मनःपूर्वक आभार मानले. "ग्राहकांनी दाखविलेला विश्वास आणि दिलेला खंबीर पाठिंबा यामुळेच संस्थेला




अल्पावधीत ही प्रगती साधता आली. ग्राहकांच्या विश्वासाला सर्वोच्च प्राधान्य देत भविष्यातही गुणवत्तापूर्ण उत्पादने व उत्तम सेवा देण्यासाठी संस्था कटिबद्ध राहील," अशी भावना व्यवस्थापनाच्या वतीने व्यक्त करण्यात आली. गुणवत्तेच्या जोरावर महाराष्ट्रात विस्तार गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करण्याचे धोरण आणि ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन सेवा देण्याच्या कार्यपद्धतीमुळे 'एम. प्रकाश ऑइल इंडस्ट्रीज'चे नाव महाराष्ट्रात परिचित होत आहे. ग्राहकांच्या पसंतीमुळे उद्योगाची वाटचाल वेगाने सुरू असून, आगामी काळात व्यवसायाचा आणखी विस्तार करण्याचा विश्वास व्यवस्थापनाने व्यक्त केला आहे. ग्राहकांकडून शुभेच्छांचा वर्षाव वितरक, हितचिंतक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून 'एम. प्रकाश ऑइल इंडस्ट्रीज'ला शुभेच्छा दिल्या जात आहेत. व्यवसायाने अशीच उत्तरोत्तर प्रगती करत यशाचे नवनवे शिखर गाठावे, अशा सदिच्छा व्यक्त होत आहेत. ग्राहकांनी आजवर दाखविलेला विश्वास आणि प्रेम यापुढेही कायम राहावे, तसेच त्यांच्या अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील राहील, असा विश्वास व्यवस्थापनाने व्यक्त केला आहे.

# पारोळ्यात महाराणा प्रतापसिंहजींच्या भव्य पुतळ्यासाठी २५ लाखांचा निधी मंजूर

## शहरात जागा उपलब्ध करून देण्याचेही आश्वासन

जन सम्राट टाईम्स

**पारोळा । प्रतिनिधी :** शौर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक असलेल्या वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंहजींचा भव्य पुतळा पारोळा शहरात उभारण्यासाठी २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्याचे आश्वासन आमदार अमोलदादा पाटील यांनी दिले. तसेच पुतळा उभारण्यासाठी शहरात योग्य जागा उपलब्ध करून देण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. पारोळा येथील संपर्क कार्यालयात राष्ट्रीय राजपूत करणी सेना (राजपूत समाज, पारोळा) यांच्या पदाधिकारी, सदस्य व समाजबांधवांनी आमदार अमोलदादा पाटील यांची भेट घेतली. यावेळी पारोळा शहरात वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंहजींचा भव्य पुतळा उभारण्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यासह आवश्यक निधी मंजूर करावा, अशी मागणी समाजाच्या वतीने करण्यात आली. समाजाच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद यावेळी आमदार अमोलदादा पाटील




यांनी समाजबांधवांशी सविस्तर संवाद साधत त्यांच्या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला. पारोळा शहराच्या वैभवात आणि सांस्कृतिक ओळखीत भर घालणाऱ्या या महत्त्वपूर्ण उपक्रमासाठी योग्य जागा उपलब्ध करून देत २५ लाख रुपयांचा निधी मंजूर करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. विविध महापुरुषांच्या स्मारकांची कामे मार्गी पारोळा शहराच्या वैभवात भर घालण्यासाठी तसेच महापुरुषांचा इतिहास आणि विचार जतन करण्याच्या दृष्टीने विविध स्मारकांची कामे सातत्याने मार्गी लावली जात आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, झाशीची राणी लक्ष्मीबाई, संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज, संत शिरोमणी जगद्गुरू तुकाराम महाराज, क्रांतीज्योती महात्मा फुले आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या भव्य पुतळ्यांच्या कामांना यापूर्वीच मंजुरी देण्यात आली आहे. याच धर्तीवर आता वीर शिरोमणी महाराणा प्रतापसिंहजींचा भव्य पुतळाही पारोळा शहरात साकारण्यात येणार आहे. भावी पिढ्यांना मिळणार शौर्याची प्रेरणा महाराणा प्रतापसिंहजींचे शौर्य, त्याग, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठा भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहेत. त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासोबतच त्यांच्या विचारांचा आणि इतिहासाचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे सांगण्यात आले. महापुरुषांचे विचार आणि इतिहास जतन करणे ही सामूहिक जबाबदारी असून, पारोळा शहराचा विकास साधताना सामाजिक व सांस्कृतिक वारसाही जपण्यासाठी कटिबद्ध असल्याचे यावेळी व्यक्त करण्यात आले.

# निशा दंडगुले यांची मनसेच्या शिरूर तालुका सचिवपदी निवड

जन सम्राट टाईम्स

**पुणे । प्रतिनिधी:** शिरूर : कु. निशा बालाजी दंडगुले यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या रस्ते, साधन-सुविधा व आस्थापना विभागाच्या शिरूर तालुका सचिवपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे शिरूर तालुक्यातील संघटनात्मक कार्यात तरुणींच्या सहभागाला बळ मिळणार असल्याचे मत व्यक्त होत आहे. मनसेचे राज्य उपाध्यक्ष सचिन भांडवलकर आणि पुणे जिल्हाध्यक्ष अविनाश लोखंडे यांच्या हस्ते निशा दंडगुले यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी त्यांचे अभिनंदन करून पुढील सामाजिक व संघटनात्मक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. रस्ते व मूलभूत सुविधांच्या प्रश्नांवर काम करण्याची संधी शिरूर तालुक्यातील रस्ते, साधन-सुविधा तसेच आस्थापना विभागाशी संबंधित प्रश्नांवर संघटनात्मक पातळीवर काम करण्याची जबाबदारी दंडगुले यांच्यावर सोपविण्यात आली आहे. नागरिकांच्या समस्या जाणून घेऊन त्या प्रशासनाच्या निदर्शनास



आणून देण्यासह संघटनेच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रम राबविण्यावर भर राहणार असल्याचे सांगण्यात आले. युवती सक्षमीकरणाला मिळणार चालना निशा दंडगुले यांच्या निवडीमुळे युवती सक्षमीकरण आणि महिला नेतृत्वाला प्रोत्साहन मिळणार असून, संघटनात्मक कार्यात तरुणींचा सहभाग वाढण्यास निश्चितच अशी प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. या निवडीबद्दल मित्रपरिवारातूनही निशा दंडगुले यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. वैष्णवी पाटील, पत्रकार एस. एन. नांदेडकर यांच्यासह अनेक मित्र-मैत्रिणींनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्याचे दंडगुले यांनी सांगितले.

# बोरगावात 'एक गाव, एक कानुबाई' उत्साहात

## भक्तिमय वातावरणात विसर्जन

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी:** बोरगाव खुर्द : खान्देशातील श्रद्धेचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या कानुबाई मातेचा 'एक गाव, एक कानुबाई' उत्सव धरणगाव तालुक्यातील बोरगाव खुर्द येथे यंदाही पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. रेशन दुकानदार धनराज प्रभाकर पाटील यांच्या निवासस्थानी आयोजित करण्यात आलेल्या तीन दिवसीय उत्सवात ग्रामस्थांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग नोंदविला. रोटपूजनाने उत्सवाची सुरुवात उत्सवाच्या प्रारंभी शनिवारी पारंपरिक पद्धतीने रोटपूजन करण्यात आले. त्यानंतर रविवारी सकाळी विधिवत पूजा-अर्चा करून कानुबाई मातेची स्थापना करण्यात आली. सायंकाळी मातेची आरती व पूजन करून पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. कानुबाई मातेच्या दर्शनासाठी परिसरातील महिला, पुरुष तसेच युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. यामुळे संपूर्ण परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. ढोल-ताशांच्या गजरात विसर्जन मिरवणूक सोमवारी सकाळी कानुबाई मातेची विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांचा गजर, पारंपरिक वाद्यांचा निनाद आणि कानुबाई मातेच्या जयघोषाने मिरवणुकीचा उत्साह द्विगुणित झाला होता.



ग्रामस्थांसह युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत भक्तिमय वातावरणात मातेचा जयजयकार केला. 'कानुबाई मातेचा विजय असो' अशा जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. मिरवणुकीदरम्यान भक्तांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत पारंपरिक पद्धतीने उत्सवाचा आनंद घेतला. 'एक गाव, एक कानुबाई'च्या माध्यमातून परंपरेचे जतन खान्देशात नागपंचमीपूर्वी येणाऱ्या रविवारी कानुबाई मातेचा उत्सव साजरा करण्याची पारंपरिक प्रथा आहे. या धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरेचे जतन करत बोरगाव ग्रामस्थांनी 'एक गाव, एक कानुबाई' या संकल्पनेतून उत्सवाचे आयोजन केले. विसर्जन मिरवणूक नदीकाठी पोहोचल्यानंतर विधिवत पूजन करण्यात आले. त्यानंतर कानुबाई मातेचे विसर्जन करून तीन दिवस चाललेल्या उत्सवाची भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली. उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी बोरगाव खुर्द येथील ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# 'संदेश भूमी' धुळे येथे 'व्यसनाचे दुष्णरिणाम' विषयावर वर्षावास प्रवचन

## तरुणांनी व्यसनांपासून दूर राहून सशक्त राष्ट्रनिर्मितीत योगदान द्यावे : प्रवचनकार सुहास रामराजे

जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** भारतीय बौद्ध महासभा, जिल्हा शाखा धुळे यांच्या वतीने आषाढ ते अश्विन पौर्णिमा वर्षावास प्रवचनमालेतील पुष्प क्रमांक ५ अंतर्गत 'व्यसनाचे दुष्परिणाम' या विषयावर प्रवचन कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या 'संदेश भूमी', मध्यवर्ती बसस्थानकाजवळ, धुळे येथे रविवार, २३ ऑगस्ट २०२६ रोजी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ बौद्धाचार्य तथा जिल्हा संघटक आयु. पोपटराव आण्णा मोहिते होते. प्रमुख अतिथी म्हणून भारतीय बौद्ध महासभेचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष सुरेश आण्णा लोंढे, जिल्हाध्यक्ष महेंद्र (आण्णा) महाले आणि जिल्हा सरचिटणीस प्रा. राम जाधव उपस्थित होते. प्रवचनकार म्हणून बौद्धाचार्य तथा जिल्हा उपाध्यक्ष सुहास रामराजे यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाकारुणिक तथागत भगवान बुद्ध आणि बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुष्पपूजन करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांनी सामूहिक त्रिशरण व पंचशील ग्रहण



केले. व्यसनाधीन तरुण देशाचे उज्ज्वल भविष्य घडवू शकत नाही 'व्यसनाचे दुष्परिणाम' या विषयावर मार्गदर्शन करताना प्रवचनकार सुहास रामराजे म्हणाले, "तरुण हा देशाचा कणा आहे. त्यामुळे तो शारीरिक तसेच मानसिकदृष्ट्या सशक्त आणि सदृढ असणे आवश्यक आहे. व्यसनाधीन तरुण वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक जीवनाबरोबरच देशाचे उज्ज्वल भविष्य घडविण्यात प्रभावी योगदान देऊ शकत नाही." भक्कम राष्ट्रनिर्मितीसाठी तरुण पिढीने सर्व प्रकारच्या वाईट व्यसनांपासून अलिप्त राहणे गरजेचे आहे. व्यसनमुक्त समाजनिर्मितीत प्रत्येकाने योगदान दिल्यास त्यामध्ये व्यक्ती, कुटुंब, समाज आणि राष्ट्राचे हित सामावलेले आहे, असेही रामराजे यांनी स्पष्ट केले. शिवनाथ सोनवणे यांचा सत्कार यावेळी शिवनाथ सोनवणे यांची धुळे महापालिकेत कायमस्वरूपी नियुक्ती झाल्याबद्दल भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने त्यांचे अभिनंदन करून स्वागत करण्यात आले. कार्यक्रमास भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा शाखा पदाधिकारी आयु. भटुभाऊ वाघ, भानुदास (दादा) भवरे, लक्ष्मण (दादा) खैरनार, उत्तरेश्वर गायकवाड, अनिल केदार, विनोद केदार, राजेश रामराजे, विशाल केदार, आनंदजी सोनवणे, भगवानदादा वाघ, नानाजी अहिरे, सुनीलभाऊ मोरे, शिवनाथ सोनवणे, तसेच यशोदाताई सपकाळे, सारंगाताई तायडे, अनिताताई रामराजे, विद्युताई सोनवणे, करिश्मा रामराजे, काजल केदार, कोमल सोनवणे, आर्यन रामराजे, वंश केदार यांच्यासह धुळे जिल्हा शाखेचे पदाधिकारी, धम्म उपासक व उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार जिल्हा कोषाध्यक्ष विजय कुमार देवरे सर यांनी मानले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी सामूहिक सरणत्तयानंतर धम्म उपासिका काजलताई अनिल केदार अर्थात केदार परिवाराच्या वतीने उपस्थितांसाठी फलाहाराची व्यवस्था करण्यात आली.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# लाडक्या कानूमातेला भक्तीभावाने निरोप दोन दिवसांच्या उत्सवानंतर वाजतगाजत विसर्जन!

## पांझरा नदीकाठी भाविकांची मोठी गर्दी, शेकडो वर्षांची परंपरा कायम

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी:** खानदेशाची कुलस्वामिनी म्हणून श्रद्धास्थान असलेल्या कानूमातेला धुळेकरांनी भक्तीभावाने आणि वाजतगाजत निरोप दिला. दोन दिवस चाललेल्या कानूमातेच्या उत्सवानंतर सोमवारी महाआरती करून मिरवणुकीद्वारे पांझरा नदीपात्रात कानूमातेचे विसर्जन करण्यात आले. यावेळी शहरातील विविध घाटांवर भाविकांची मोठी गर्दी झाली होती. “कानूमाते की जय… कन्हेर राजाची जय…” अशा जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. कानूमातेला निरोप देताना भाविकांनी चांगला पाऊस पडू दे, बळीराजाला सुखाचे दिवस येऊ देत, शेतीला भरभरून उत्पन्न मिळू दे, अशी मनोभावे प्रार्थना केली. कुटुंबीय एकत्र आले; पुरणपोळीचा नैवेद्य, जागरण अन् फुगड्यांचा उत्साह शनिवारी शहरासह जिल्ह्यातील विविध ठिकाणी मोठ्या भक्तिमय वातावरणात कानूमातेची स्थापना करण्यात आली. या उत्सवानिमित्त परिवारातील सर्व सदस्य एकत्र येत कानूमातेला विविध पदार्थांचा नैवेद्य दाखवतात.

विशेषतः पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण करून रात्री जागरण, नृत्य आणि फुगड्यांचा आनंद घेत उत्सव साजरा करण्यात आला. दोन दिवसांच्या या उत्सवामुळे घराघरांत आनंदाचे आणि भक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. पारंपरिक पद्धतीने पूजा-अर्चा करत कानूमातेचे मनोभावे स्मरण करण्यात आले.महाआरतीनंतर वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली.असंख्य कुटुंबीय आणि भाविक या मिरवणुकीत सहभागी झाले होते. भाविकांनी डोक्यावर कानूमातेची मूर्ती घेत नृत्य करत आणि जयघोष करत भक्तिमय वातावरणात पांझरा नदीपात्राकडे प्रस्थान केले.



पांझरा नदीच्या विविध ठिकाणी भाविकांची मोठी गर्दी झाल्याचे दिसून आले.पारंपरिक श्रद्धा आणि उत्साहाचा संगम झाल्याने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. शंभर वर्षांहून अधिक काळाची श्रद्धेची परंपरा धुळे शहरासह जिल्ह्यात कानूमातेच्या उत्सवाला शंभर वर्षांहून अधिक काळाची परंपरा असल्याचे सांगितले जाते. पिढ्यान्‌पिढ्या जपली गेलेली ही परंपरा आजही तितक्याच उत्साहाने आणि श्रद्धेने सुरू आहे. बदलत्या काळातही कानूमातेच्या उत्सवाच्या माध्यमातून कुटुंबीयांचे एकत्र येणे, पारंपरिक रूढी-परंपरांचे जतन आणि सामाजिक एकोपा कायम असल्याचे चित्र यानिमित्ताने पाहायला मिळाले. खानदेशाची कुलस्वामिनी म्हणून श्रद्धास्थान असलेल्या कानूमातेला धुळेकरांनी भक्तीभावाने आणि वाजतगाजत निरोप दिला. दोन दिवस चाललेल्या कानूमातेच्या उत्सवानंतर सोमवारी महाआरती करून मिरवणुकीद्वारे पांझरा नदीपात्रात कानूमातेचे विसर्जन करण्यात आले. यावेळी शहरातील विविध घाटांवर भाविकांची मोठी गर्दी झाली होती. “कानूमाते की जय… कन्हेर राजाची जय…” अशा जयघोषांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. कानूमातेला निरोप देताना भाविकांनी चांगला पाऊस पडू दे, बळीराजाला सुखाचे दिवस येऊ देत, शेतीला भरभरून उत्पन्न मिळू दे, अशी मनोभावे प्रार्थना केली. वातावरणात कानूमातेची स्थापना करण्यात आली. या उत्सवानिमित्त परिवारातील सर्व सदस्य एकत्र येत कानूमातेला विविध पदार्थांचा नैवेद्य दाखवतात. विशेषतः पुरणपोळीचा नैवेद्य अर्पण करून रात्री जागरण, नृत्य आणि फुगड्यांचा आनंद घेत उत्सव साजरा करण्यात आला. दोन दिवसांच्या या उत्सवामुळे घराघरांत आनंदाचे आणि भक्तीचे वातावरण निर्माण झाले होते.

## राष्ट्रीय राजपूत करणी सेनेच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी हर्षल पाटील



जन सम्राट टाईम्स

**भुसावळ| प्रतिनिधी :** कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती स्व. अशोकभाऊ पंडित पाटील यांचे चिरंजीव, आरोग्यदूत तथा पत्रकार हर्षल पाटील (राजपूत) यांची श्री राष्ट्रीय राजपूत करणी सेनेच्या जिल्हा कार्याध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष प्रवीणसिंग पाटील यांच्या आदेशानुसार ही नियुक्ती करण्यात आली. प्रदेश कार्यकारी अध्यक्ष दामोदर राजपूत यांच्या हस्ते हर्षल पाटील यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कारही करण्यात आला. संघटनेच्या माध्यमातून समाजहितासाठी विविध उपक्रम राबविण्यासह सामाजिक बांधिलकी जपण्याची जबाबदारी हर्षल पाटील यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे संघटनेच्या कार्याला अधिक बळ मिळेल, असा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. यावेळी श्री राष्ट्रीय राजपूत करणी सेनेचे प्रदेश सचिव आनंदा पाटील, जिल्हाध्यक्ष संदीप सिंह राणा, जिल्हाध्यक्ष विठ्ठलसिंग मोरे, महिला जिल्हाध्यक्ष सारिका ताई पाटील, जिल्हा सरचिटणीस चंदू चव्हाण, जिल्हा सरचिटणीस पंकज चौधरी, जिल्हा सचिव कविता पाटील, भुसावळ तालुकाध्यक्ष प्रदीप पाटील, भुसावळ ग्रामीण तालुकाध्यक्ष नितीन पाटील, महिला तालुकाध्यक्ष जयश्री पाटील, भुसावळ कार्यकारी अध्यक्ष सुरेश पाटील,शहराध्यक्ष गोकुळ पाटील, महिला शहराध्यक्ष प्रतीक्षा पाटील यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

## पॅसेंजर गाड्या भुसावळ-मुंबई भारत सरकार पुन्हा सुरू करणार का?

### ‘खान्देश हित संग्राम’चा एल्गार



जन सम्राट टाईम्स

**जळगाव| प्रतिनिधी :** “ब्रिटिशांनी आम्हाला दिलेल्या दोन पॅसेंजर गाड्या भुसावळ-मुंबई भारत सरकार पुन्हा सुरू करणार का?” असा सवाल उपस्थित करत खान्देश हित संग्रामच्या वतीने खान्देशच्या हक्कांसाठी तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. खान्देश वाशियांचे अस्तित्व संपविण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप करत, “आम्ही खान्देशी म्हणून मुका मार सहन करीत आहोत. भारत सरकारने मुंबई-भुसावळ रोज सकाळी आणि रात्री पॅसेंजर दिलेल्या होत्या; परंतु या दोन्ही गाड्या कायमच्या बंद करण्यात आल्या. त्यानंतरही नवे नियोजन करून प्रवाशांना दिलासा देण्याऐवजी सुविधा कमी केल्या जात आहेत,” अशी नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. ‘मुंबई-नांदेड एक्स्प्रेसही आमच्या हक्काची’ खान्देश हित संग्रामच्या प्रवक्त्यांनी मुंबई-नांदेड एक्स्प्रेसच्या प्रश्नावरही भूमिका मांडली. “ही गाडी खान्देशच्या हक्कासाठी मागितली गेली होती. आज ती खान्देशातून धावते; मात्र तिचा योग्य लाभ खान्देशातील प्रवाशांना मिळत नाही,” असा आरोप करण्यात आला. तसेच कोविड काळात बंद करण्यात आलेल्या रेल्वेसेवा अद्याप पूर्ववत झाल्या नसल्याबद्दलही संताप व्यक्त करण्यात आला. खान्देशातील नागरिकांना रेल्वे, पाणी आणि रोजगारासाठी सातत्याने संघर्ष करावा लागत असल्याचे सांगण्यात आले. ‘खान्देशी नेत्यांना फक्त इतर गाड्यांचा थांबा हवा’ खान्देशातील लोकप्रतिनिधींवरही या वेळी टीका करण्यात आली. “खान्देशातील नेत्यांना फक्त इतर गाड्यांचे त्यांच्या मतदारसंघात थांबे मिळवून घेण्यात रस आहे. मात्र खान्देशच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष होत आहे,” असा आरोप करण्यात आला. “थांबा मिळाला की काय डोळे ताणून पाहता? अशा प्रकारे खान्देशचा विकास होणार नाही. खान्देशच्या हक्कासाठी ठोस भूमिका घेण्याची वेळ आली आहे,” असेही प्रवक्त्यांनी नमूद केले. ‘खान्देशी नागरिकांनी आता उद्रेक करावा’ खान्देशच्या प्रश्नांवर सातत्याने दुर्लक्ष होत असल्यास नागरिकांनी संघटित होऊन आंदोलन उभारावे, असे आवाहन करण्यात आले. “खासदार-आमदारांना घरात कार्यकर्ता मेळावे घेण्यापेक्षा खान्देशच्या प्रत्येक प्रश्नावर उत्तरदायी धरले पाहिजे.

## ‘राजमाता जिजाऊ’ बस लोकार्पण सोहळा भाजप- महायुतीने हायजॅक केला

जन सम्राट टाईम्स

**यावल । प्रतिनिधी:** यावल नगरपरिषदेच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या ‘राजमाता जिजाऊ’ बस लोकार्पण सोहळ्यावरून स्थानिक राजकारण चांगलेच तापले आहे. शासकीय व प्रशासकीय स्वरूपाचा असलेला हा कार्यक्रम भाजप आणि महायुतीच्या नेत्यांनी ‘हायजॅक’ करून त्याला राजकीय स्वरूप दिल्याचा गंभीर आरोप माजी नगराध्यक्ष अतुल पाटील यांनी केला आहे. लोकनियुक्त नगराध्यक्षांना डावलल्याचा आरोप ‘राजमाता जिजाऊ’ बस लोकार्पण सोहळ्याच्या आयोजनात यावलच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा छाया पाटील यांना योग्य तो मान-सन्मान देण्यात आला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. कार्यक्रमाच्या व्यासपीठावरील उपस्थिती आणि नियोजनात नगराध्यक्षांना डावलण्यात आल्याने स्थानिक राजकीय वर्तुळात नाराजी व्यक्त होत आहे. शासकीय यंत्रणेच्या माध्यमातून होणाऱ्या कार्यक्रमात लोकनियुक्त लोकप्रतिनिधींना योग्य स्थान मिळणे अपेक्षित



असताना त्यांना डावलण्यात आल्याचा आरोप या निमित्ताने करण्यात आला आहे. ‘लोकार्पण शासकीय, श्रेय भाजपचे?’ या प्रकारावर माजी नगराध्यक्ष अतुल पाटील यांनी भाजप आणि महायुतीच्या नेत्यांवर जोरदार टीका केली. शासकीय खर्चातून आणि नगरपरिषदेच्या माध्यमातून होणाऱ्या कार्यक्रमाचे श्रेय राजकीय पक्षांकडून घेण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला. “कार्यक्रम शासकीय खर्चातून आणि नगरपरिषदेच्या माध्यमातून होत असताना भाजप व महायुतीचे नेते त्याचे राजकीय श्रेय लाटण्याचा प्रयत्न करत आहेत.

लोकनियुक्त लोकप्रतिनिधींना डावलून राजकीय वर्चस्व दाखविणे हा लोकशाहीचा अपमान आहे,” असा घणाघाती सवाल अतुल पाटील यांनी उपस्थित केला. यावलमध्ये राजकीय वातावरण तापले ‘राजमाता जिजाऊ’ बस लोकार्पण सोहळ्यावरून सुरू झालेल्या या वादामुळे यावल शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

शासकीय कार्यक्रमाच्या आयोजनात लोकप्रतिनिधींना दिलेले स्थान, कार्यक्रमाचे राजकीयीकरण आणि श्रेयवाद यावरून शहरात राजकीय चर्चांना उधाण आले आहे. दरम्यान, या आरोपांबाबत भाजप अथवा महायुतीच्या संबंधित पदाधिकाऱ्यांची भूमिका समोर आलेली नाही. त्यांची प्रतिक्रिया मिळाल्यानंतरच या वादाचे चित्र अधिक स्पष्ट होणार आहे. यावल नगरपरिषदेच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या ‘राजमाता जिजाऊ’ बस लोकार्पण सोहळ्यावरून स्थानिक राजकारण चांगलेच तापले आहे.

## पाचोऱ्यात काँग्रेसच्या अनुसूचित जाती विभागाची आढावा बैठक

### सर्व घटकांना काँग्रेसच्या प्रवाहात आणण्याचा निर्धार

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा । (प्रतिनिधी):** जळगाव जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाचे नूतन जिल्हाध्यक्ष ॲड. अंकुश कटारे यांच्या अध्यक्षतेखाली पाचोरा येथे प्रमुख कार्यकर्त्यांची आढावा बैठक उत्साहात पार पडली. काँग्रेसचे माजी नगराध्यक्ष बापू सोनार यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी पाचोरा येथील शासकीय निवासस्थानी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी माजी नगराध्यक्ष बापू सोनार यांच्या हस्ते नूतन जिल्हाध्यक्ष ॲड. अंकुश कटारे यांचा सत्कार करण्यात आला.

जिल्हा दौऱ्यात मिळालेल्या प्रतिसादाबद्दल त्यांनी कटारे यांचे कौतुक केले. तसेच अनुसूचित जाती विभागाच्या जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी पाचोऱ्याला दिल्याबद्दल काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष अनिरुद्ध वनकर आणि जिल्हा काँग्रेस कमिटीचे



अध्यक्ष ॲड. अविनाश भालेराव यांचे आभार मानले. जिल्ह्यात सर्वसमावेशक संघटन उभारणार यावेळी बोलताना नूतन जिल्हाध्यक्ष ॲड. अंकुश कटारे यांनी जळगाव जिल्ह्यात अनुसूचित जातीतील सर्व घटकांना एकत्रित करून काँग्रेससोबत सर्वसमावेशक आणि मजबूत संघटन उभारण्याचा निर्धार व्यक्त केला. तळागाळातील कार्यकर्त्यांशी संपर्क वाढवून अनुसूचित जातीतील विविध समाजघटकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी तसेच त्यांना काँग्रेसच्या मुख्य प्रवाहात सहभागी करून घेण्यासाठी आगामी काळात व्यापक जनसंपर्क अभियान राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. बैठकीत काँग्रेसच्या संघटनात्मक बांधणीसह आगामी काळातील पक्षाच्या वाटचालीबाबत कार्यकर्त्यांशी चर्चा करण्यात आली. पक्षाची ताकद वाढविण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले. पदाधिकारी, कार्यकर्त्यांची उपस्थिती बैठकीस पाचोरा शहराध्यक्ष शकील शेख, जिल्हा काँग्रेसचे सरचिटणीस नंदू भाऊ सोनार, अनिरुद्ध साळवे, जुलाल भाऊ गायकवाड, आनंद बागुल, राजू भोसले, ॲड. प्रदीप सूर्यवंशी, ॲड. सुनील सोनवणे यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

## गिरणा पंपिंग रोड परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ; एकाच रात्री पाच घरे फोडली

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा । प्रतिनिधी:** पाचोरा शहरातील गिरणा पंपिंग रोड परिसरातील एकदंत रेसिडेन्सी व साई पार्क भागात अज्ञात चोरट्यांनी धुमाकूळ घातल्याची घटना समोर आली आहे. दि. २४ ऑगस्ट रोजी पहाटेच्या सुमारास चोरट्यांनी एकाच लाईनीतील तब्बल पाच घरे फोडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. एकाच रांगेतील पाच घरे लक्ष्य मिळालेल्या माहितीनुसार, चोरीच्या उद्देशाने अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्रीनंतर या परिसरातील घरांना लक्ष्य केले.

एकाच रांगेतील तब्बल पाच घरांचे दरवाजे अथवा कुलूप तोडून चोरट्यांनी घरात प्रवेश केला.'

मात्र, चोरट्यांच्या हाती धुपाटणे लागल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. संबंधित घरांमधून नेमका किती ऐवज चोरीला गेला किंवा चोरीचा प्रयत्न कितपत यशस्वी झाला, याबाबतची अधिकृत माहिती पोलिसांच्या तपासानंतरच



स्पष्ट होणार आहे. पोलिसांकडून सीसीटीव्ही फुटेजची तपासणी घटनेची माहिती मिळताच पाचोरा पोलीस निरीक्षक राहुल कुमार पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेत पाहणी केली. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासण्यास सुरुवात केली असून, चोरट्यांचा माग काढण्यासाठी विविध दिशेने तपास सुरू केला आहे. नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर एकाच रात्री एकाच परिसरातील पाच घरे फोडण्यात आल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

रात्रीच्या वेळी पोलिसांची गस्त वाढवावी तसेच या घटनेतील चोरट्यांचा तातडीने शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे. परिसरातील एकदंत रेसिडेन्सी व साई पार्क भागात अज्ञात चोरट्यांनी धुमाकूळ घातल्याची घटना समोर आली आहे. दि. २४ ऑगस्ट रोजी पहाटेच्या सुमारास चोरट्यांनी एकाच लाईनीतील तब्बल पाच घरे फोडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

## बहिणाबाईंच्या कविता म्हणजे जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणारा अजरामर अभंग

### कला व विज्ञान महाविद्यालयात कवयित्री बहिणाबाई चौधरी जयंतीनिमित्त अभिवादन

जन सम्राट टाईम्स

**भुसावळ |प्रतिनिधी:** “निसर्गकन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी यांची कविता ही केवळ मनोरंजनासाठीची रचना नसून मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान सांगणारा अजरामर अभंग आहे,” असे प्रतिपादन मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. जतीन मेढे यांनी केले. कला व विज्ञान महाविद्यालयातील मराठी विभाग व लेवा गणबोली भाषा अभ्यास व संवर्धन केंद्राच्या वतीने कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून प्रा. डॉ. जतीन मेढे बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. जी. कोल्हे होते. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात मराठी विभागातील प्रा. डॉ. दिनेश पाटील यांनी बहिणाबाई चौधरी यांच्या जीवनकार्याचा आणि साहित्यिक योगदानाचा परिचय करून दिला. बहिणाबाईंच्या कवितेची वैशिष्ट्ये स्पष्ट करताना प्रा. डॉ. मेढे म्हणाले की, “बहिणाबाईंची कविता म्हणजे मराठी साहित्यातील एक फार मोठा चमत्कार आहे. महाराष्ट्रातील प्रतिभावंत साहित्यिक प्र. के. अत्रे यांनी त्यांच्या काव्यरचनेला ‘मोहरांचा हंडा’ आणि ‘बावन्न कशी सोने’ अशा शब्दांत गौरविले. यातूनच बहिणाबाईंच्या कवितेचे अनमोल साहित्यिक मूल्य अधोरेखित होते.” संगम शाळेची कोणतीही पायरी न चढलेल्या बहिणाबाईंच्या कवितेचा शालेय अभ्यासक्रमापासून विद्यापीठाच्या अभ्यासक्रमापर्यंत समावेश झाला, ही त्यांच्या साहित्यिक प्रतिभेची मोठी पावती आहे. त्यांच्या कवितेत ग्रामीण जीवन, निसर्ग, कष्टकरी माणूस, कौटुंबिक नाती आणि सुख-दुःखांचे वास्तव यांचे अत्यंत सहज आणि प्रभावी चित्रण आढळते. “मानवी जीवनाची वाट सुख-दुःखांच्या किनाऱ्यांनी निर्माण झालेली असते. या सुख-दुःखांना सकारात्मकतेने आणि आनंदाने कसे सामोरे जावे, याचा विचार व मार्गदर्शन बहिणाबाईंची कविता मानवाला देते. त्यामुळे त्यांची कविता ही केवळ साहित्यकृती न राहता माणसाच्या सुख-दुःखांना समजून घेणारी जीवनानुभवांची ओवी ठरते,” असेही प्रा. डॉ. मेढे यांनी सांगितले. कार्यक्रमास उपप्राचार्य मुकेश चौधरी, मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. जतीन मेढे, प्रा. डॉ. दिनेश पाटील यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.निसर्गकन्या कवयित्री बहिणाबाई चौधरी यांची कविता ही केवळ मनोरंजनासाठीची रचना नसून मानवी सांगणारा अजरामर अभंग आहे,” असे प्रतिपादन मराठी विभागप्रमुख प्रा. डॉ. जतीन मेढे यांनी केले. कला व विज्ञान महाविद्यालयातील मराठी विभाग व लेवा गणबोली व संवर्धन केंद्राच्या वतीने कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## सचिन तायडे यांची ऑल इंडिया पँथर सेनेच्या सावदा शहराध्यक्षपदी नियुक्ती

जन सम्राट टाईम्स

**सावदा । प्रतिनिधी:** सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेत आयु. सचिन तायडे यांची ऑल इंडिया पँथर सेनेच्या सावदा शहराध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेच्या वतीने त्यांना नियुक्तीपत्र देऊन पुढील सामाजिक व संघटनात्मक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. नियुक्तीपत्रात तायडे यांनी ऑल इंडिया पँथर सेनेच्या माध्यमातून दलित, शोषित, पीडित, वंचित, आदिवासी, मुस्लिम आणि बहुजन समाजातील घटकांच्या न्याय व हक्कांसाठी प्रभावीपणे कार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. जनसामान्यांच्या मूलभूत प्रश्नांसाठी आंदोलनात्मक भूमिका घेत लोकशाही व संविधानिक मार्गाने जनआंदोलन उभे करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. दलित अत्याचार, जातीय भेदभाव आणि सामाजिक विषमतेविरोधात सातत्याने आवाज उठवून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी प्रयत्न करण्याची जबाबदारी तायडे यांच्यावर सोपविण्यात आली आहे. शहर, तालुका आणि गाव पातळीवर संघटनेची बांधणी अधिक मजबूत करणे, कार्यकर्त्यांना संघटित करणे तसेच सामाजिक बांधिलकी जपत संघटनेचे ध्येय-धोरण जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याची अपेक्षाही नियुक्तीपत्रातून व्यक्त करण्यात आली आहे.

संविधानाच्या मूल्यांचे संरक्षण, सामाजिक न्याय आणि वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी संघर्ष करण्याच्या भूमिकेतून तायडे यांची नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल सामाजिक व संघटनात्मक क्षेत्रातून त्यांचे अभिनंदन होत असून, पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# अनुसूचित जातीतील सर्व घटकांना काँग्रेसच्या मुख्य प्रवाहात आणणार : अ‍ॅड. अंकुश कटारे

जन सम्राट टाईम्स



**चाळीसगाव | प्रतिनिधी :** अनुसूचित जातीतील सर्व घटकांना काँग्रेस पक्षाच्या मुख्य प्रवाहात आणून पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी व्यापक जनसंपर्क अभियान राबविण्यात येईल, असा निर्धार काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे जळगाव जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. अंकुश कटारे यांनी व्यक्त केला. काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीच्या उद्देशाने अ‍ॅड. अंकुश कटारे यांच्या दौऱ्यादरम्यान हिरापूर रोड येथील काँग्रेस कमिटीच्या जनसंपर्क कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. बैठकीस तालुकाध्यक्ष अ‍ॅड. वाडीलाल भाऊ चव्हाण, शहराध्यक्ष नितीन भाऊ राजपूत यांच्यासह पक्षाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. अनुसूचित जातीतील सर्व घटकांना संघटित करण्यावर भर यावेळी अ‍ॅड. अंकुश कटारे यांनी काँग्रेस पक्षाची ध्येय-धोरणे आणि अनुसूचित जाती विभागाच्या आगामी कार्याची माहिती दिली. अनुसूचित जातीतील विविध समाजघटकांशी संवाद वाढवून त्यांना काँग्रेसच्या विचारधारेसोबत जोडण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच आगामी काळात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविणे, तळागाळातील कार्यकर्त्यांशी संपर्क वाढविणे आणि अनुसूचित जाती विभागाची प्रभावी बांधणी करणे, यावर विशेष भर देण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. कार्यकर्त्यांना मार्गदर्शन तालुकाध्यक्ष अ‍ॅड. वाडीलाल चव्हाण यांनी काँग्रेस पक्षाची ध्येय-धोरणे आणि आगामी काळातील संघटनात्मक कार्यक्रमाबाबत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. पक्षाच्या विचारधारेचा प्रसार तळागाळापर्यंत करण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी प्रदेश सरचिटणीस राहुल मोरे, प्रदेश सचिव अनिरुद्ध साळवे, जिल्हा उपाध्यक्ष मंगेश अग्रवाल, जिल्हा सचिव नितीन परदेशी, तसेच नितीन सूर्यवंशी, विजय राजपूत, अमजद खान, गोकुळ सानप, अ‍ॅड. मयूर निकम, दशरथ वाघ, अनंत बागुल, राजू भोसले, सोमनाथ मोरे, सागर निकम, पंडित चव्हाण, सुभाष राठोड, निसार मुख्तार सय्यद, अंकुश राठोड, रघुनाथ पवार, अरुण राठोड, समाधान ठाकरे, भूषण पगारे, दीपक सर, सिद्धार्थ मोरे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत उपस्थित मान्यवरांनी पक्ष संघटन वाढीसाठी आपली मते मांडली. आगामी काळात पक्षाच्या संघटनात्मक वाटचालीला अधिक गती देण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. शहराध्यक्ष नितीन भाऊ राजपूत यांनी उपस्थित सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे आभार मानले.अनुसूचित जातीतील सर्व घटकांना काँग्रेस पक्षाच्या मुख्य प्रवाहात आणून पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी व्यापक जनसंपर्क अभियान राबविण्यात येईल, असा निर्धार काँग्रेस अनुसूचित जाती विभागाचे जळगाव जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. अंकुश कटारे यांनी व्यक्त केला. काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीच्या उद्देशाने अ‍ॅड. अंकुश कटारे यांच्या दौऱ्यादरम्यान हिरापूर रोड येथील काँग्रेस कमिटीच्या जनसंपर्क कार्यालयात बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी ते कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. बैठकीस तालुकाध्यक्ष अ‍ॅड. वाडीलाल भाऊ चव्हाण, नितीन भाऊ राजपूत यांच्यासह पक्षाचे विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी एरंडोलमध्ये निवेदन, विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न

## मागण्या तातडीने मान्य न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

जन सम्राट टाईम्स



**एरंडोल। प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच वसतिगृहांमध्ये शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या विविध मागण्या तातडीने पूर्ण करण्यात याव्यात, या मागणीसाठी आदिवासी टायगर सेनेच्या वतीने एरंडोल येथील प्रांत अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.आदिवासी टायगर सेनेचे राज्य प्रवक्ते पंढरीनाथ मोरे यांनी हे निवेदन सादर केले. शासनाने नुकत्याच काढलेल्या शासन निर्णयातील जाचक अटींमुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या संविधानिक अधिकारांवर परिणाम होत असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. तसेच आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या सोयी-सुविधा, शैक्षणिक दर्जा आणि सुरक्षेकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने विद्यार्थ्यांच्या जीविताचा प्रश्न निर्माण होत असल्याचेही नमूद करण्यात आले. महाराष्ट्रातील विविध ठिकाणी आदिवासी विद्यार्थी आपल्या मागण्यांसाठी आंदोलने करीत असून, या आंदोलनांना आदिवासी टायगर सेनेने पाठिंबा जाहीर केला आहे. शासनाने विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. प्रमुख मागण्या निवेदनातून शासनाकडे पुढील मागण्या करण्यात आल्या आहेत : महाराष्ट्र तसेच नाशिक येथे सुरू असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनातील मागण्या तातडीने मान्य करून शासनाने नुकताच काढलेला जाचक अटींचा शासन निर्णय रद्द करावा. धानोरा तालुक्यातील जपतलई येथील आश्रमशाळेत सर्पदंशामुळे मृत्यू झालेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक कोटी रुपये सानुग्रह अनुदान देण्यात यावे. जखमी विद्यार्थिनींना प्रत्येकी दहा लाख रुपये तसेच उपचार व पुनर्वसनासाठी आवश्यक मदत देण्यात यावी. बोगस आदिवासी प्रमाणपत्रांच्या माध्यमातून भरली गेल्याचा आरोप असलेली १२,२५० पदे तातडीने रिक्त घोषित करून अनुशेषासह आदिवासी उमेदवारांची भरती करण्यात यावी. जिल्हा, विभाग आणि राज्य स्तरावरील शासकीय वसतिगृहांमध्ये सुरू असलेली डीबीटी व्यवस्था बंद करून स्थानिक भोजन व्यवस्था पूर्ववत करण्यात यावी. तालुका व ग्रामीण भागातील शासकीय आश्रमशाळा आणि वसतिगृहांमध्ये सुरू असलेली सेंट्रल किचन व्यवस्था बंद करून स्थानिक भोजन व्यवस्था पुन्हा सुरू करण्यात यावी. जिल्हा व तालुकास्तरावरील शासकीय वसतिगृहांची विद्यार्थी क्षमता वाढविण्यात यावी. सर्व शासकीय अनुदानित तसेच विनाअनुदानित आश्रमशाळांची निष्पक्ष चौकशी करण्यात यावी. विद्यार्थ्यांच्या सुख-सुविधा व सुरक्षेकडे दुर्लक्ष करणाऱ्या आश्रमशाळांवर कठोर कारवाई करण्यात यावी. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलनाचा इशारा आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे शासनाने तातडीने लक्ष देऊन त्यांची अंमलबजावणी करावी. अन्यथा आदिवासी टायगर सेनेच्या माध्यमातून संविधानिक मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे.

# न्हावी ग्रामसभेत नागरिकांचा रोष; रस्ते, गटारी व बससेवेच्या प्रश्नावर ग्रामस्थ आक्रमक

## मूलभूत सुविधांच्या दुरवस्थेवरून प्रशासनाला जाब; १५व्या वित्त आयोगाचा निधी मिळाल्याने कामे मार्गी लावण्याचे सरपंचांचे आश्वासन

जन सम्राट टाईम्स

**यावल | (प्रतिनिधी):** यावल तालुक्यातील न्हावी येथे ग्रामपंचायत सरपंच देवेंद्र चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा पार पडली. ग्रामसभेत गावातील विविध मूलभूत सुविधांच्या दुरवस्थेवरून ग्रामस्थांनी प्रशासनाला धारेवर धरत आपल्या समस्या मांडल्या. रस्ते, गटारी, मोकाट कुत्र्यांचा वाढता वावर तसेच बससेवेच्या प्रश्नावरून ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेतली. रस्ते, गटारी आणि बससेवेवरून संताप ग्रामसभेत नागरिकांनी गावातील मुख्य तसेच अंतर्गत रस्त्यांची झालेली दुरवस्था, ठिकठिकाणी साचलेले पाणी व तुंबलेल्या गटारी याकडे प्रशासनाचे लक्ष वेधले. गावात मोकाट कुत्र्यांचा वावर वाढल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रारही करण्यात आली. तसेच विद्यार्थी आणि प्रवाशांच्या सोयीसाठी भुसावळ-न्हावी बससेवा तातडीने सुरू करण्यात यावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली. नागरी सुविधांच्या अभावामुळे नागरिकांना दैनंदिन जीवनात अडचणींचा सामना करावा लागत असल्याने प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. विकासकामे रखडल्याचे सरपंचांचे स्पष्टीकरण ग्रामस्थांच्या आक्रमक भूमिकेनंतर



सरपंच देवेंद्र चोपडे यांनी नागरिकांची समजूत काढत विकासकामे रखडण्यामागील कारणे स्पष्ट केली. १५व्या वित्त आयोगाचा निधी मिळण्यास झालेला विलंबतांत्रिक अडचणींमुळेत्यामुळे काही ठिकाणी नागरी सुविधांची दुरवस्था निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले. आमदार अमोल हरिभाऊ जावळे यांच्या विशेष प्रयत्नांतून आता १५व्या वित्त आयोगाचा निधी प्राप्त झाल्याचे सरपंचांनी ग्रामसभेत नमूद केले. उपलब्ध निधीतून गावातील रस्त्यांची डागडुजी, गटारींची स्वच्छता तसेच इतर आवश्यक नागरी कामे प्राधान्याने हाती घेण्यात येतील,सरपंचांच्या आश्वासनानंतर ग्रामस्थांचा रोष काहीसा शांत झाला. मात्र, प्रत्यक्ष कामांना कधी सुरुवात होते आणि रखडलेल्या नागरी समस्या किती लवकर मार्गी लागतात, याकडे आता ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

# राष्ट्रीय वर्षावास प्रवचन मालिकेचे सहावे पुष्प संपन्न

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर' विषयावर भरत शिरसाठ यांचे प्रभावी धम्मप्रवचन

जन सम्राट टाईम्स



**चोपडा| प्रतिनिधी :** : भारतीय बौद्ध महासभा, जळगाव पूर्व अंतर्गत चोपडा तालुक्याच्या वतीने राष्ट्रीय वर्षावास प्रवचन मालिकेचे सहावे पुष्प चोपडा येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. समता सैनिक दलाचे प्रमुख आयु. शालिग्राम व्यंकट करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी तथागत भगवान गौतम बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन आयु. संगीता भरत शिरसाठ यांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर उपस्थितांनी त्रिशरण व पंचशील ग्रहण केले. 'सिम्बॉल ऑफ नॉलेज – डॉ. बाबासाहेब आंबेडकर'वर धम्मदेसना वर्षावास प्रवचन मालिकेतील सहाव्या पुष्पात 'सिम्बॉल ऑफ नॉलेज – डॉ. बाबासाहेब आंबेडकर' हा विषय घेण्यात आला. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे शहराध्यक्ष तथा बौद्धाचार्य आयु. भरत भिमराव शिरसाठ यांनी प्रभावी धम्मदेसना देत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ज्ञान, शिक्षण, सामाजिक समता आणि मानवमुक्तीच्या विचारांवर प्रकाश टाकला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी शिक्षण आणि ज्ञानाच्या माध्यमातून वंचित समाजाला आत्मभान, स्वाभिमान आणि समानतेचा मार्ग दाखविला. त्यांच्या विचारांचा अंगीकार करून समाजाने प्रगतीच्या दिशेने वाटचाल करावी, असे आवाहन प्रवचनातून करण्यात आले. पदाधिकारी व उपासक-उपासिकांची उपस्थिती कार्यक्रमास अध्यक्ष आयु. शालिग्राम व्यंकट करंदीकर, तसेच जानकीराम शंकर सपकाळे, संजय पिरा अहिरे, वसंत बाबुराव शिंदे, छोटुभाऊ वारडे, अनिल गोरख वाडे, संजय साळुंखे सर, दीक्षा भरत शिरसाठ यांच्यासह भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, बौद्ध उपासक व उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. वर्षावासाच्या निमित्ताने आयोजित या प्रवचन मालिकेतून धम्मविचार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे परिवर्तनवादी विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

# गाढोदे येथे वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे सहावे पुष्प संपन्न

जन सम्राट टाईम्स



**जळगाव | प्रतिनिधी :** जळगाव पूर्व अंतर्गत जळगाव तालुक्याच्या वतीने आयोजित राष्ट्रीय वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे सहावे पुष्प गाढोदे (ता. जळगाव) येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. यावेळी केंद्रीय शिक्षिका आयु. नी. ज्योतीताई विलास भालेराव यांनी 'सिम्बॉल ऑफ नॉलेज डॉ. बाबासाहेब आंबेडकर' या विषयावर सोप्या आणि प्रभावी भाषेत प्रबोधन केले. प्रवचनातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ज्ञानसंपन्न व्यक्तिमत्त्वाचा, त्यांच्या विचारांचा आणि समाज परिवर्तनातील योगदानाचा आढावा घेण्यात आला. ज्ञान, शिक्षण आणि सामाजिक समतेचा मार्ग स्वीकारून समाजाने प्रगती साधावी, असा संदेश यावेळी देण्यात आला. मान्यवरांची उपस्थिती कार्यक्रमास आद. विद्याताई झनके (जिल्हा पर्यटन सचिव), आद. सुषमाताई इंगळे (जिल्हा कार्यालयीन सचिव), आयु. राजेश इंगळे (तालुका अध्यक्ष, जळगाव), आद. किरण सोनवणे (तालुका संस्कार सचिव), आद. गौतम सपकाळे (बौद्धाचार्य), आद. आधारअण्णा सपकाळे (माजी श्रामणेर), आद. समिंदर सपकाळे (माजी श्रामणेर), आद. संतोष सपकाळे (माजी श्रामणेर) यांची प्रमुख उपस्थिती होती. गाढोदे महिला ग्राम शाखेच्या अध्यक्षा आद. कविताताई सपकाळे यांच्यासह त्यांच्या संपूर्ण कार्यकारिणीने कार्यक्रमाच्या आयोजनात सहभाग घेतला. उपासक-उपासिकांचा उत्स्फूर्त सहभाग कार्यक्रमाला गाढोदे तसेच परिसरातील श्रद्धाशील बौद्ध उपासक-उपासिका, बालक-बालिका मोठ्या संख्येने उपस्थित होते. वर्षावासाच्या निमित्ताने आयोजित या धम्म प्रवचन मालिकेतून समाजात धम्मविचार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार पोहोचविण्याचा प्रयत्न होत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयु. गौतम सपकाळे यांनी केले, तर आभार आयु. नी. कविताताई सपकाळे यांनी मानले.

जन सम्राट टाईम्स — अँकर न्यूज

# 'जनमाणसांतील तुकोबा भाग दोन' पुस्तकाचे प्रकाशन

## पुस्तकाचे भंडारा येथील साहित्यिका अस्मिता मेश्राम 'पुष्पांजली' यांच्या हस्ते प्रकाशन

जन सम्राट टाईम्स




**जळगाव | प्रतिनिधी:** ढिवरे लिखित 'जनमाणसांतील तुकोबा भाग दोन' या पुस्तकाचे रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात प्रकाशन करण्यात आले. भंडारा येथील सुप्रसिद्ध साहित्यिका अस्मिता मेश्राम 'पुष्पांजली' यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन सोहळा पार पडला. मिथुन ढिवरे यांच्या 'जनमाणसांतील तुकोबा भाग एक' या पुस्तकाचा पहिला भाग मागील वर्षी प्रकाशित झाला होता. त्यानंतर आता त्याच साहित्यिक वाटचालीचा पुढील टप्पा म्हणून 'जनमाणसांतील तुकोबा भाग दोन' वाचकांच्या भेटीला आला आहे. संत साहित्य सामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न पुस्तक प्रकाशनप्रसंगी बोलताना साहित्यिका अस्मिता मेश्राम 'पुष्पांजली' यांनी साहित्य म्हणजे काय, साहित्यनिर्मिती कशी होते आणि लेखकाने समाजाशी असलेले नाते कशा पद्धतीने साहित्याच्या माध्यमातून व्यक्त करावे, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. साहित्यिक मिथुन ढिवरे यांनी आपल्या मनोगतात 'जनमाणसांतील तुकोबा भाग दोन' हे पुस्तक लिहिण्यामागील प्रेरणा आणि त्याच्या लेखनाची प्रक्रिया स्पष्ट केली. संत परंपरेतून मिळालेली प्रेरणा या पुस्तकाच्या र्मिर्तीमागे असल्याचे त्यांनी सांगितले. महाराष्ट्राला समृद्ध संत परंपरेचा वारसा लाभला असून संतांचे अभंग आणि साहित्य मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. मात्र हे संतवाङ्मय सर्वसामान्यांपर्यंत अधिक सहजपणे पोहोचावे, या उद्देशाने संत तुकाराम महाराजांच्या अभंगांचे सोप्या भाषेत निरूपणपर स्पष्टीकरण या पुस्तकातून करण्यात आल्याचे ढिवे यांनी सांगितले. पुस्तकाचे महत्त्व अधोरेखित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नेमीवंत धांडे सर होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी 'जनमाणसांतील तुकोबा भाग दोन' या पुस्तकाचे महत्त्व तसेच साहित्यिक मिथुन ढिवरे यांच्या साहित्यिक योगदानावर भाष्य केले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून अथर्व प्रकाशनचे युवराज माळी उपस्थित होते. याशिवाय शहर व जिल्ह्यातील साहित्यिक, वाचक, साहित्यप्रेमी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थित राहून लेखकाला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. शांताराम तायडे यांनी केले. वाचकांना पुस्तकाची सप्रेम भेट कार्यक्रमाच्या समारोपानंतर उपस्थित वाचकप्रेमी आणि साहित्यप्रेमींना चहा, नाश्ता तसेच प्रकाशित झालेले 'जनमाणसांतील तुकोबा भाग दोन' हे पुस्तक सप्रेम भेट देण्यात आले. पुस्तक प्रकाशन सोहळ्यामुळे उपस्थित साहित्यप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण होते. ढिवरे लिखित 'जनमाणसांतील तुकोबा भाग दोन' या पुस्तकाचे रविवारी उत्साहपूर्ण वातावरणात प्रकाशन करण्यात आले. भंडारा येथील सुप्रसिद्ध साहित्यिका अस्मिता मेश्राम 'पुष्पांजली' यांच्या हस्ते पुस्तक प्रकाशन सोहळा पार पडला. मिथुन ढिवरे यांच्या 'जनमाणसांतील तुकोबा भाग एक' या पुस्तकाचा पहिला भाग मागील वर्षी प्रकाशित झाला होता. त्यानंतर आता त्याच साहित्यिक वाटचालीचा पुढील टप्पा म्हणून 'जनमाणसांतील तुकोबा भाग दोन' वाचकांच्या भेटीला आला आहे.

# रक्ताने माखलेले कपडे... पण माणुसकीने जिंकली मने!

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा | प्रतिनिधी :** कर्तव्य बजावताना अनेक अधिकारी आपली जबाबदारी पार पाडतात; मात्र संकटाच्या क्षणी स्वतःचा विचार न करता अनोळखी व्यक्तींच्या मदतीसाठी धावून जाणारे अधिकारी समाजाच्या मनात कायमचे स्थान निर्माण करतात. पाचोरा शहराबाहेर घडलेली एका अपघाताची घटना याच माणुसकीची जिवंत साक्ष ठरली आहे. तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी विजय पवार आणि पिंपळगाव (हरे) केंद्राचे विशेष शिक्षक घनःश्याम चौधरी हे वरखेडी येथे वसतिगृह तपासणीसाठी गेले होते.

तपासणीचे काम पूर्ण करून ते पाचोऱ्याकडे परतत असताना साइमोक्ष लॉन्स परिसराच्या जवळ त्यांना भीषण अपघात झालेला दिसला. दुचाकीसमोर कुत्रा आल्याने अपघात मोटारसायकलसमोर अचानक कुत्रा आडवा आल्याने दुचाकी घसरून हा अपघात झाल्याचे सांगण्यात आले. या दुर्घटनेत कोकडी तांडा येथील वृद्ध दाम्पत्य आणि त्यांची मुलगी गंभीर जखमी झाले होते. वृद्ध दाम्पत्याची शुद्ध हरपली होती, तर त्यांची मुलगी जखमी अवस्थेत मदतीसाठी विव्हळत होती. अपघाताचे दृश्य पाहताच गटशिक्षणाधिकारी विजय पवार यांनी क्षणाचाही विलंब न करता आपले वाहन थांबविले. आजूबाजूला गर्दी जमण्याची किंवा इतर कोणीतरी मदतीला येण्याची वाट न पाहता त्यांनी स्वतः पुढाकार घेतला. विशेष शिक्षक घनःश्याम चौधरी यांच्या मदतीने तिन्ही जखमींना आपल्या वाहनातून तातडीने पाचोरा येथील धन्वंतरी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. कपडे रक्ताने माखले; पण जीव वाचविणे महत्त्वाचे जखमींना वाहनात बसविताना त्यांच्या अंगावरील रक्तामुळे विजय पवार यांच्या कपड्यांवर रक्ताचे डाग पडले. वाहनातही रक्त सांडले. मात्र त्या क्षणी कपडे खराब होतील किंवा वाहन अस्वच्छ होईल, याचा त्यांनी विचार केला नाही. संकटात सापडलेल्या व्यक्तीचा जीव वाचविणे आणि त्यांना तातडीने उपचार मिळवून देणे, हेच त्यांनी महत्त्वाचे मानले.